# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५०६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—१५/०८/२०१६.

**१) मोटार सायकलची चोरी . :—**

दिनांक १३/०८/२०१६ रोजी २१.०० ते १४/०८/२०१६ चे ०५.३० वा. दर. यातील फिर्यादी राजेश किशन तितीरमारे वय २३ वर्ष, रा. खैरी यांनी आपली मोटार सायकल क्र. एमएच ३६ एस १२९४ काळया रंगाची कि. अंदाजे ३५,०००/—रू. घरच्या खुल्या वरांडयात ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मोका पाहुण चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) इन्व्हेंनेशन कंपनीची बॅटरी व सायरन सेटची चोरी . :—**

दिनांक १३/०८/२०१६ रोजी १५.०० वा. ते १४/०८/२०१६ चे ०८.०० वा. दर. यातील फिर्यादी बालु शिवराम मंजलवार वय २७ वर्ष, रेंज फॉरेस्ट ऑफीस लाखांदुर हा लाखांदुर बिट क्र. कक्ष ३२४ संरक्षीत वन पिंपळगाव कोहळी येथे वनरक्षक या पदावर कार्यरत असुन त्याचे बिट मदतगार शेशराव कोवे रा. पिपळगाव कोहळी याने गट क्र. ७१७ आलेसुर पाहाडी जवळ असलेली सौर फिनीशींग लाईनला जोडण्यात आलेल्या इव्हेंनेशन कंपनी बॅटरी इनरजायजर सेट, सायरन सेट असा एकुण अंदाजे ८,०००/—रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोयर पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**३) अल्पवयीन मुलीला दुखापत केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १४/०८/२०१६ रोजी १७.०० वा. दर. यातील फिर्यादी उमेश नागो लंजे वय २७ वर्ष, रा. वलमाझरी याची मुलगी ही घराशेजारील मुलांसोबत खेळत असता यातील आरोपी हा दारु पिऊन ईथे कशाला खेळता या कारणा वरुन फिर्यादीचे मुलीचे उजवे बाजुला डोक्यावर, कपाळावर दगड मारुन आपखुशीने दुखापत केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सिंधीमेश्राम पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) अवैध देशी दारु/जुगार अडयांवर धाडी. :—**

दिनांक १५/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. सिहोरा व वरठी येथील परीसरातील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५ लिटर हातभट्टी कि. ३००/—रु. चा तसेच जुगारातुन कि. १,३२० /—रु. माल एकुण कि. १,६२०/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

(श्री.एस. टी. घुसर )
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५६११९१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.